# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट ३१३ - २३ दिनांक : - १४/०९/२०२३

## मोबाईल चोरी करणा-या सराईत गुन्हेगाराकडुन ८ गुन्हयांची उकल करण्यात गुन्हे शाखा कक्ष- २ वसई यांना यश

वालीव पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात फिर्यादी गोविंद कनीराम पवार, वय ४५ वर्ष,व्यवसाय- गंवडी, रा.बंजारापाडा, स्मशानभुमीजवळ, गोखीवरे, वसई पुर्व वसई पुर्व, ता.वसई, जि.पालघर यांचे राहते घराचा दरवाजा अर्धवट उघडा असताना त्यावाटे दिनांक २३/०७/२०२२ रोजी ०५.२० वाजता ते ०५.३० वाजताच्या सुमारास कोणत्या तरी अज्ञात चोरटयाने घरातप्रवेश प्रवेश करुन फिर्यादीच्या संमतीशिवाय लबाडीचे ईरादयाने चोरी करुन नेली असल्याबाबतची फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वालीव पोलीस ठाण्यात गु.रजि. नं ७२०/२०२२ भा.द.वि.सं कलम ३८० प्रमाणे नोंद करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे हद्दिमध्ये सतत होणा-या मोबाईल चोरींचे प्रमाण वाढत असल्याने सदर मोबाईल चो-यांवर आळा घालणेबाबत मा. वरीष्ठांनी ओदशित केले होते. त्या अनुषंगाने घडणा-या प्रत्येक मोबाईल चोरीच्या गुन्हयाचे ठिकाणी प्रत्यक्ष भेट देवून चोरीस गेलेले मोबाईल हे सतत सायबर सेल मार्फत सर्वेक्षणावर ठेवून गुन्हे शाखा कक्ष -२ वसई यांचे मार्फतीने गुन्हयातील आरोपीताचा शोध घेण्यात येत होता. त्याप्रमाणे गुप्त बातमीदाराकरवी व मोबाईलचे तांत्रीक विश्लेषणाव्दारे वालीव ७२०/२०२२ भादविस कलम ३८० प्रमाणे या मोबाईल चोरीच्या गुन्हयांतील आरोपीताचे नावाची उकल करुन इसम जाकिर अली मेहबुब अली शेख उर्फ कालीया रा. आशा नगर, मुंबई अहमदाबाद महामार्गाचे शेजारील झोपडपट्टी, नायगाव, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर यास ताब्यात घेवुन सदर आरोपीत याचा सदर गुन्हातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास वर नमुद गुन्हात अटक करुन त्याचेकडे अधिक तपास केला असता त्याचेकडुन इकडील आयुक्तालयातील वालीव पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील घरफोडीचे ४ गुन्हे तसेच मोबाईल चोरीचे ४ असे एकुण ८ गुन्हे उघडकीस आले आहेत

**-: उघडकीस आलेले गुन्हे :-**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.रजी नं. |
|---|---|---|
| १. | वालीव पोलीस ठाणे | ७२०/२०२२ भा.द.वि.सं कलम ३८० प्रमाणे (मुळ गुन्हा ) |
| २. | वालीव पोलीस ठाणे | २३९/२०२२ भा.द.वि.सं कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे |
| ३. | वालीव पोलीस ठाणे | २६५/२०२२ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ४. | वालीव पोलीस ठाणे | ६०१/२०२२ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे |
| ५. | वालीव पोलीस ठाणे | ६९३/२०२२ भा.द.वि.सं कलम ४५७, ३८० प्रमाणे |
| ६. | वालीव पोलीस ठाणे | ७०५/२०२२ भा.द.वि.सं कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे |
| ७. | वालीव पोलीस ठाणे | ११०३/२०२२ भा.द.वि.सं कलम ३८० प्रमाणे |
| ८. | वालीव पोलीस ठाणे | १३८१/२०२२ भा.द.वि.सं कलम ४५४, ३८० प्रमाणे |

अटक आरोपीत याचेकडुन उघडकीस आणलेल्या घरफोडी व मोबाईल चोरीच्या एकुण ८ गुन्हयात एकुण १,४९,०००/- रुपये किंमतीचे १२ मोबाईल असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अटक आरोपी विरुध्द ०१. मेघवाडी पोलीस स्टेशन, मुंबई, ०२. पवई पोलीस ठाणे, मुंबई, ०३. साकिनाका पोलीस ठाणे, मुंबई, ०४. धारावी पोलीस ठाणे, मुंबई, ०५. तुळींज पोलीस ठाणे, मि.भा.व.वि. ०६. नवघर पोलीस ठाणे, मुंबई याठीकाणी एकुण ०८ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई मा. श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, स.पो.नि. सुहास कांबळे, सागर शिंदे, स.फौ.संजय नवले, रमेश भोसले, पो.हवा. प्रफुल्ल पाटील, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, दादा आडके, पो.ना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अं. अमोल कोरे, सायबर शाखेचे स.फौ.संतोष चव्हाण, म.सु.ब. अविनाश चौधरी, रामेश्वर केकान यांनी केली आहे.

**----0000----**